दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार | 20 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 272 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







# धुळीचे लोट, खड्ड्यांचा त्रास आणि अपूर्ण: काम !

## राजस्थानच्या वाळवंटासारखी धूळ आणि दयनीय अवस्थेतील पूल ; परळी गंगाखेड मार्गावरील पुलाचे वास्तव




## विकासकामांच्या विलंबाचा फटका थेट सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाला

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

परळी–गंगाखेड या प्रमुख मार्गावरील पुलाचे काम गेल्या काही वर्षांपासून रखडल्याने परिसरातील रस्त्यांची अक्षरशः दयनीय अवस्था झाली आहे. विकासकामांना प्रशासकीय अनास्थेचे ग्रहण लागल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत असून प्रवाशांना दररोज खड्डे, धूळ आणि उखडलेल्या रस्त्यांमुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

तीन ते चार वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असलेले पुलाचे काम आणि छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरातील उखडलेले रस्ते यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला आहे. वाहनचालकांना वारंवार अपघाताचा धोका निर्माण होत असून पादचारी आणि विद्यार्थ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांवरील मोठे खड्डे, धुळीचे ढग आणि विस्कळीत वाहतूक यामुळे नागरिकांच्या संतापात वाढ होत आहे.

स्थानिकांच्या मते, पुलाचे काम जसे आहे तसेच रखडल्यामुळे दररोज प्रवास करताना जीव मुठीत घेऊन जावे लागते. प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करून काम पूर्ण करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

## अनेक वर्षांपासून रखडले आहे काम

## धुळीच्या लोटांनी नागरिक त्रस्त

व्यापारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना या समस्येचा मोठा फटका बसत असून दैनंदिन कामकाजावरही परिणाम होत आहे. दरम्यान, रस्त्यांची दुरुस्ती व पुलाचे काम तातडीने पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून प्रवाशांच्या सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. परळी शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या या मार्गाची दुरवस्था ही प्रशासनासाठी चिंतेचा विषय बनली असून लवकरात लवकर काम मार्गी लावण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे. रस्त्यावरील मोठे खड्डे, सैल माती आणि अपूर्ण कामामुळे वाहने जाताना धुळीचे मोठे लोट उठत आहेत. यामुळे नागरिक, व्यापारी, विद्यार्थी तसेच प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना धुळीमुळे त्रास, डोळ्यांची जळजळ होत आहे. नुकतेच या भागातील उडणाऱ्या धुळीचे लोट दर्शविणारे वास्तवदर्शी छायाचित्र परळी येथील धनंजय आरबुने यांनी टिपले असून त्यातून रस्त्यांची दयनीय अवस्था अधोरेखित झाली आहे. छायाचित्रांमधून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेली परिस्थिती स्पष्टपणे समोर आली आहे.

### सर्वसामान्य ते व्यावसायिकांना सहन करावा लागतोय नाहक त्रास !

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी करूनही कामाला गती मिळालेली नाही. विकासकामे रखडल्याने वाहतूक विस्कळीत होत असून दैनंदिन जीवनावर, व्यापारावर तसेच, दुचाकी स्वार, पादचारी तसेच शालेय विद्यार्थ्यांना या सर्व गोष्टींचा त्रास सहन करावा लागत आहे .

### राजस्थानातील वाळवंटासारखे धुळीचे दृश्य

परळी–गंगाखेड मार्गावरील पुलाचे रखडलेले काम आणि उखडलेले रस्ते यामुळे परिसरातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. मागील अनेक वर्षांपासून हे काम त्याच अवस्थेत असल्याने रस्त्यावर प्रचंड धूळ उडत असून परिसरात राजस्थानातील वाळवंटासारखे धुळीचे दृश्य पाहायला मिळत आहे. प्रशासनाने तातडीने पुलाचे काम पूर्ण करून रस्त्यांची दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांकडून देण्यात येत आहे.

# "शिवतीर्थावर" शिवजयंती सोहळा उत्साहात; आमदार सुरेश धस यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती



**आष्टी (प्रतिनिधी):**

सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी आज १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. काही दिवसांपूर्वीच या ठिकाणी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते, त्यानंतरचा हा पहिलाच शिवजयंती उत्सव असल्याने परिसरात मोठे चैतन्य पाहायला मिळाले.

या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार सुरेश धस यांनी उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी दत्ताभाऊ काकडे (प्रदेशाध्यक्ष, सरपंच परिषद), शिवाजी राऊत (माजी जिल्हा परिषद सदस्य), रंगा आण्णा धोंडे (माजी नगराध्यक्ष), सुनील रेडेकर (नगरसेवक), संजय खोटे (माजी सरपंच), ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप, उपाध्यक्ष शरद भाऊ रेडेकर, भारतीय जैन संघटनेचे प्रीतम भोगावत, भीमराव गुरव, राजेंद्र लाड, विनोद नाना रोडे उपस्थित होते. 'शिवतीर्थ' हे निवासस्थान भगव्या ध्वजांनी आणि फुलांच्या सजावटीने उजळून निघाले होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी शिवरायांच्या कार्याचा गौरव करत शुभेच्छा दिल्या. दत्ताभाऊ काकडे यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शिवप्रेमींमुळे या सोहळ्याला भव्य स्वरूप प्राप्त झाले होते.

# अमेरिका-भारत व्यापार करारावरून केंद्र सरकारवर सचिन पायलट यांचा घणाघात; "शेतकरी व सार्वभौमत्व धोक्यात"

**मुंबई : वृत्तसंस्था**

अमेरिका-भारत व्यापार कराराच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारवर काँग्रेसचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी जोरदार टीका केली आहे. व्यापार करार हे आर्थिक प्रगतीचे साधन असले तरी ते समान अटींवर आणि परस्पर लोकहिताच्या आधारावरच असले पाहिजेत; देशाच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणारे करार कदापि स्वीकारार्ह नाहीत, असा घणाघाती इशारा त्यांनी दिला. टिळक भवन येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी मोदी सरकारवर थेट निशाणा साधला.


सचिन पायलट म्हणाले की, अमेरिका-भारत व्यापार करार दबावाखाली करण्यात आल्याचा आरोप होत असून या करारामुळे देशातील शेतकरी, शेती आणि ऊर्जा सुरक्षेच्या हितांना धक्का बसू



शकतो. भारताच्या डिजिटल स्वायत्तता आणि डेटा गोपनीयतेवरही गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. शेतकरी आणि देशहिताचे संरक्षण करण्याऐवजी सरकारने आत्मनिर्भरतेशी तडजोड केल्याचा आरोप त्यांनी केला.

या करारानुसार अमेरिकन कृषी व अन्न उत्पादनांना भारतात शुल्कमुक्त प्रवेश दिला जाणार असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे मका, ज्वारी, सोयाबीन, कापूस, तेलबिया, फळे व सुका मेवा उत्पादक शेतकऱ्यांवर मोठा परिणाम होऊ शकतो. विशेषतः महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, पंजाब आणि कर्नाटक या कापूस उत्पादक राज्यांना अमेरिकन कापसाच्या आयातीमुळे मोठा फटका बसू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच GM पिकांच्या आयातीला मुभा देणे, नॉन-टॅरिफ अडथळे कमी करणे आणि शेतकरी अनुदानावर परिणाम करणाऱ्या अटी या दीर्घकालीन दृष्टीने जैवविविधतेसाठी धोकादायक ठरू शकतात, असेही त्यांनी सांगितले. ऊर्जा सुरक्षेच्या संदर्भात रशिया व इराणकडून स्वस्त कच्चे तेल खरेदीवर दबाव आणला जात असल्यास ते भारताच्या हिताविरुद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.



# आष्टी मतदारसंघात शिवजयंती उत्साहात साजरी

## १०१ फूट उंच भगव्या ध्वजाचे दिमाखदार ध्वजारोहण ; आ . सुरेश धस यांच्या हस्ते उत्साहात संपन्न

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी मतदारसंघात शिवजयंतीनिमित्त आयोजित विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना आमदार सुरेश धस यांनी उपस्थित राहून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना विनम्र अभिवादन केले. विविध ठिकाणी पार पडलेल्या कार्यक्रमांमधून स्वराज्य, स्वाभिमान आणि न्यायनिष्ठ शासनव्यवस्थेचा संदेश देत समाजहितासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

आष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात १०१ फूट उंच ध्वजारोहण समारंभ दिमाखात पार पडला. यावेळी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व आरती करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त आयोजित विविध शालेय स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस प्रोत्साहन देण्यात आले.

पांढरी (ता. आष्टी) येथे शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सहभागी होत महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. जाती-पाती व धर्माच्या पलीकडे जाऊन समतेचे आणि न्यायाचे राज्य प्रस्थापित करणाऱ्या शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

मुर्शदपूर (ता. आष्टी) येथील माऊली नगर परिसरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात अभिवादन करून स्वराज्य स्थापनेतील अद्वितीय शौर्य, शिस्तबद्ध लष्करी संघटन आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश अधोरेखित करण्यात आला.

शिवतीर्थ निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा करण्यात आला.

जळगाव, कडा कारखाना परिसर (ता. आष्टी) येथेही महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचे स्मरण करण्यात आले.

मौजे कुसळंब (ता. पाटोदा) येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारण्यात आलेल्या अश्वरूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ग्रामस्थांशी संवाद साधताना शिवरायांच्या लोककल्याणकारी विचारांचा गौरव करण्यात आला.

आष्टी येथील श्रीराम मंदिरात आयोजित शिवजयंती कार्यक्रमात महाराजांच्या मूर्तीचे विधिवत पूजन करण्यात आले. धर्म, न्याय आणि स्वाभिमानाच्या अधिष्ठानावर उभारलेले स्वराज्य आजही प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

आष्टी शहरातील वडाचा गणपती, भाजी मंडई रोड परिसरात सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात मानवंदना अर्पण करण्यात आली. शिवरायांनी अन्यायाविरुद्ध उभारलेला लढा आणि सर्वसमावेशक, लोकाभिमुख राज्यव्यवस्थेचा आदर्श पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

आष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात १०१ फूट उंच ध्वजारोहण समारंभ दिमाखात पार पडला. यावेळी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व आरती करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त आयोजित विविध शालेय स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस प्रोत्साहन देण्यात आले.

पांढरी (ता. आष्टी) येथे शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सहभागी होत महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. जाती-पाती व धर्माच्या पलीकडे जाऊन समतेचे आणि न्यायाचे राज्य प्रस्थापित करणाऱ्या शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

मुर्शदपूर (ता. आष्टी) येथील माऊली नगर परिसरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात अभिवादन करून स्वराज्य स्थापनेतील अद्वितीय शौर्य, शिस्तबद्ध लष्करी संघटन आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश अधोरेखित करण्यात आला.

शिवतीर्थ निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा करण्यात आला.

जळगाव, कडा कारखाना परिसर (ता. आष्टी) येथेही महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचे स्मरण करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमांना मतदारसंघातील मान्यवर, नागरिक, युवक, महिला, पत्रकार बांधव व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# अंकल सॅमचा मदतीचा हात

सगळ्या जगावर टॅरिफ युद्ध लादणारे अंकल सॅम यांनी अखेर नमते घेतले. भारतावर लादलेले ५०% टॅरिफ १८ टक्क्यांवर आणल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. ट्रम्प यांच्या या घोषणेमुळे भारत-अमेरिकेत होणाऱ्या मुक्त व्यापार कराराचा मार्ग मोकळा झाला.

अमेरिकेने भारतावर लादलेला टॅरिफ २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणणे आणि दोन्ही देशांनी द्विपक्षीय व्यापार समझोता करण्यासंदर्भात ठोस प्रगती करणे या दोन्ही गोष्टी भारतासाठी अत्यंत मोलाच्या आणि उपयुक्त आहेत. या करारावर उभय देशांमध्ये बोलणी झाली ती अत्यंत सकारात्मक. त्यांना लवकरच अंतिम स्वरूप देण्यात येईल असे सांगण्यात येते. अर्थात ट्रम्प यांनी भारतावर लादलेला टॅरिफ १८ टक्क्यांवर आणल्याचे जाहीर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ट्रम्प यांचे आभार मानले. आता याचा फायदा कोणत्या क्षेत्रांना होईल याचा विचार केला तर भारतातील वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू आणि कार्पेट्स यांच्या निर्यातीला यातून मोठा लाभ होणार आणि यापेक्षाही मोठा फायदा हा की या करारामुळे मध्यम मुदतीचा मॅक्रो बुस्ट व्यापार आणि भांडवली ओघातून मिळेल. भारताला आता रशियाकडून तेलाची खरेदी कमी करावी लागणार आणि ते आवश्यक होते. कारण अमेरिकेला नाराज करून भारताला तेलाची खरेदी परवडणार नव्हती आणि त्या बदल्यात व्हेनेझुएलाकडून तेलाची खरेदी करावी लागेल. भारत अमेरिकेविरुद्धचे भारताचे टॅरिफ आणि नॉन टॅरिफ अडथळे शून्यावर आणले जातील. अर्थात काही प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. ट्रम्प प्रशासनाने भारतावर अनेकदा आरोप केला की भारत रशियाकडून तेल खरेदी वाढवून रशियाच्या युद्धाला अप्रत्यक्ष निधी पुरवत आहे. ट्रम्प यांनी दावा केला, की मोदी यांनी रशियाकडून तेल खरेदी थांबवण्यास आणि व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करण्यास संमती दर्शवली आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे, की वाढत्या भू-राजकीय अनिश्चिततेमुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आणि आता अनेक महिन्यांच्या वाटाघाटीनंतर त्यात स्पष्टता आली. पण सर्वात मोठा लाभ हा आहे, की टॅरिफ कपातीनंतर भारतातील निर्यातदारांना अमेरिकेला निर्यात वाढवण्याची आशा आहे. इतकेच नव्हे तर भारतातून सीफुड निर्यातही वाढण्याची शक्यता आहे.

या कराराचा दोन्ही देशांना फायदा आहे. भारत आता अमेरिकेकडून पेट्रोलियम, संरक्षण आणि औषधे तसेच दूरसंचार उत्पादने आणि विमाने खरेदी करेल. यामुळे भारताच्या संरक्षण सिद्धतेत वाढ होईल आणि अमेरिकन ऊर्जा आणि कोळसा भारत खरेदी करू शकतो याचा फायदा संबंधित क्षेत्रांना होईल आणि भारतीय शेतकरी यांचे जीवनमान सुसह्य होईल. अर्थात हा पहिला टप्पा आहे आणि येत्या काही महिन्यांत अधिक व्यापक करारावर वाटाघाटी केल्या जातील. भारत-अमेरिका व्यापार करारातील संदिग्धता आता नष्ट झाल्यामुळे भारताची निर्यात वाढेल. पण यासोबतच ट्रम्प यांनी एचवनबी व्हिसा शुल्क वाढवल्यामुळे आणि त्यांच्या अमेरिका फर्स्ट या धोरणामुळे इमिग्रेशन धोरण कडक केल्यामुळे भारतीयांना कामावर ठेवणे अमेरिकेतील उद्योगांना शक्य नाही. सेवा क्षेत्रातील धोरणाबाबत अस्पष्टता कायम आहे. भारत-अमेरिका हे दोन्ही देश राजकीय विषयांवर तोडगे काढतात; परंतु महत्त्वाचे आर्थिक प्रश्न तसेच ठेवतात असे चित्र निर्माण झाले. भारत-अमेरिका व्यापार करारामुळे मेड इन इंडिया उपक्रमासाठी लाभदायक बाब ठरली आहे असे मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केले. कारण आता १८ टक्के टॅरिफ परस्पर आकारला जाईल. यामुळे दोन्ही देशांना याचा लाभ होईल आणि त्यामुळे ही आनंदाची बातमी आहे, असे त्यानी म्हटले आहे. अर्थात या घटनेमुळे एकूणच भारतीय अर्थजगतात आनंददायी वातावरण असले तरीही राजकीय हालचाली वाढल्या. काँग्रेसने मोदी सरकारवर तीव्र हल्ला चढवला असून काँगेस नेते रमेश यांनी शेलक्या शब्दांत टीका केली, की वॉशिंग्टनमध्ये मोगँबो खूश हुआ. यातील उपरोध लक्षात यावा असा आहे. पण भारत रशियापासून दूर गेलेला नाही.

भारताने अमेरिकेशी केवळ करार केला आहे आणि तो दोन्ही देशांच्या फायद्याचा आहे. जयराम रमेश यांनी टीका केली, की हा करार खरेच इतका जर मोठा असता तर त्याची घोषणा भारताने का केली नाही. पण रमेश यांच्या टीकेकडे लक्ष देण्याची गरज नाही. कारण या करारामुळे भारतातील निर्यातदारांना आणि इतर अनेक व्यापाऱ्यांना फायदा होणार आहे. मोठ्या निर्णयांची माहिती आम्हाला अमेरिकेकडून का मिळत आहे असा त्यांचा सवाल आहे. पण भारताने यापूर्वीही अमेरिकेला कठोर उत्तर दिले होते आणि भारत अमेरिकेच्या आहारी नाही हे स्पष्ट केले होते. खरे कारण आहे ते टॅरिफ अस्त्रामुळे भारत संतप्त झाला होता आणि त्याने अमेरिका नाही तर नाही युरोपशी ट्रेड वाटाघाटी सुरू केल्या. यामुळे ट्रम्प यांनी १८ टक्के टॅरिफ लावण्याची तयारी दर्शवली. ट्रम्प यांनी भारतासमोर गुडघे टेकले. यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार ५०० अब्ज डॉलर इतका वाढू शकतो. अमेरिकन कंपन्या भारतात याव्यात अशी भारताची इच्छा आहे आणि भारताने म्हणूनच कंपन्यांसाठी टॅक्स होलिडे वाढवला. ट्रम्प यांना भारताशी हा करार करण्याशिवाय पर्यायच नव्हता. भारत आणि अमेरिका यांच्यात द्विपक्षीय करार होणे हा ऐतिहासिक क्षण आहे हे मत राजनाथ यांनी व्यक्त केले. पण यापेक्षा मोदी यांनी अशी खेळी खेळली आहे, की चीनची अडचण वाढली. आता चीनचा प्रशांत महासागरात प्रभाव कमी होऊन भारताचे सामर्थ्य वाढले. त्यामुळे चीनचा संताप होणे साहजिक आहे. इतकेच नव्हे तर भारत आणि अमेरिका यांच्यातील करारामुळे क्वाड अंतर्गत चीनच्या सीमावर्ती भागात तणाव वाढला आहे. चीनची प्रशांत महासागरात मनमानी करण्याची प्रवृत्ती वाढली होती तिला आळा बसला. अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या चीनमधून आपला व्यवसाय अन्यत्र वळवत आहे आणि यामुळेही चीनच्या आर्थिक वर्चस्वाला हादरा बसत आहे. त्यापेक्षा आणखी एक महत्त्वाचा परिणाम असा, की भारत अमेरिका सहकार्यामुळे चीनच्या सीमेवरील हालचालींवर मर्यादा येत आहे. भारत आता अधिक सतर्क झाल्यामुळे चीनला दडपशाही करणे अवघड झाले. भारत आता जागतिक दक्षिणमध्ये आपला प्रभाव वाढवत असल्यामुळे चीनची आशियातील एकाधिकारशाही कमी होत आहे. पंतप्रधान मोदी यांनी सांगितले, की विरोधक टीका करत होते. पण आम्ही संयम राखला आणि आज त्याचे परिणाम देशासमोर आहे. उत्पादन वाढवा, दर्जेदार उत्पादन तयार करा आणि देशाला विकसित भारत बनवण्याच्या दिशेने मदत करा असे आवाहन त्यानी केले. हाच या संपूर्ण विवेचनाचा मूलमंत्र आहे.





## सिनेरंग

### व्हॅलेंटाइन डेच्या मुहुर्तावर गर्लफ्रेंड बॉयफ्रेंड चित्रपटाची घोषणा

■ व्हॅलेंटाइन डे अर्थात प्रेम दिन सर्व प्रेमिकांसाठी मोठा दिवस असतो. याच प्रेम दिनाच्या मुहुर्तावर गर्लफ्रेंड बॉयफ्रेंड या नव्या, भव्य चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. उत्तम स्टारकास्ट आणि पुरेपूर मनोरंजन करणारी कथा या चित्रपटात पहायला मिळणार आहे. शिव लोखंडे आणि ऋतुजा पाटील प्रस्तुतकर्ते असलेल्या या चित्रपटाची निर्मिती करण के के यांनी केली आहे. सरोज परदेशी, समृद्धी राज, विनोद कांबळे सहनिर्माते आहेत व शिवाकांत तिवारी एसोसिएट प्रोड्यूसर आहेत. चित्रपटाचं दिग्दर्शन रेखा करन यांनी केलं आहे. शिवानी बावकर, निखिल वैरागर, सक्षम कुलकर्णी, ऐश्वर्या शिंदे, अक्षय टंकसाळे, किशोर चौघुले, अभय कुलकर्णी, राजश्री पोहेकर -कुलकर्णी, समृद्धी राज आणि सोमन चौहान अशी उत्तमोत्तम कलाकारांची फळी या चित्रपटात आहेत. त्यामुळे अव्वल अभिनयाची पर्वणी प्रेक्षकांना मिळणार आहे. प्रेम ही संकल्पना अजरामर आहे. अनेक चित्रपटांतून आजवर प्रेम ही संकल्पना, त्याचे वेगवेगळे पदर उलगडण्यात आले आहेत. मात्र, काळानुरुप प्रेम या संकल्पनेला नवनवे आयाम मिळतात. त्यामुळे आजच्या एआयच्या काळात Girlfriend Boyfriend चित्रपटातून प्रेमाची आणि तरुणाईची गोष्ट कशा पद्धतीने मांडली जाते याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

### संविधानाची ताकद, दर्शविणारा 'कलम का बादशाह'

■ कायद्याची धार, संविधानाची ताकद आणि अन्यायाविरोधातील जिद्द या सगळ्यांचा थरारक संगम म्हणजे व्हि.एम.भैलुमे निर्मित आणि आनंदकुमार सरवदे दिग्दर्शित नवा मराठी चित्रपट 'कलम का बादशाह'. सत्तेला प्रश्न विचारणारी आणि सामान्य माणसाच्या हक्कांचा आवाज बनणारी ही कथा लवकरच प्रेक्षकांसमोर उलगडणार आहे. 'कलम का बादशाह' हा सिनेमा दीक्षा आणि जय या दोन तरुणांच्या संघर्षमय प्रवासाची सशक्त मांडणी करतो. अन्याय, भीती आणि सत्तेच्या दबावासमोर न झुकता ते संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचा आधार घेत लढा उभारतात. कायदा हेच त्यांचं शस्त्र ठरतं आणि धैर्य ही त्यांची खरी ताकद. या प्रवासात ते फक्त शत्रूशीच नव्हे, तर समाजातील व्यवस्थात्मक त्रुटींशीही भिडतात, ज्यामुळे हा सिनेमा केवळ थरारक न राहता विचारप्रवर्तक ठरतो. या चित्रपटात मोनालिसा बागल, यश डिंबळे, आनंद शिंदे आणि जय मोर्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत. २०२३ मध्ये आलेला सिनेमा 'रावरंभा' नंतर काही काळ पडद्यापासून दूर राहिलेली अभिनेत्री मोनालिसा बागल 'कलम का बादशाह' या चित्रपटातून सुमारे दोन ते तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा दमदार भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचे कथा व दिग्दर्शन आनंदकुमार सरवदे यांनी केले मनोरंजनाच्या पलीकडे जाऊन प्रश्न विचारायला भाग पाडणारा आणि संविधानाच्या शक्तीची जाणीव करून देणारा सिनेमा 'कलम का बादशाह' लवकरच आपल्या जवळच्या सिनेमागृहात.पाहता येईल.

### नात्यांच्या गुंत्यातील भावविश्व गहिरे करणारा 'माया'चा ट्रेलर प्रदर्शित!

■ नातेसंबंधांवर भाष्य करणारे चित्रपट प्रेक्षकांना नेहमीच आपलेसे वाटतात. कारण ते केवळ कथा सांगत नाहीत, तर आयुष्यात व्यक्त न केल्या गेलेल्या भावनांना शब्द देतात. अशाच भावविश्वाला स्पर्श करणाऱ्या 'माया' या चित्रपटाचा ट्रेलर आता प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

■ माया'चा ट्रेलर एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतो, माणूस खरोखरच एकटेपणाला घाबरतो की पोरकेपणाच्या भावनेला? नात्यांमध्ये निर्माण होणाऱ्या गैरसमजुती, मनात साचत जाणाऱ्या अढी आणि त्या अढीमुळे दुरावत जाणारी माणसं यांचा भावनिक प्रवास ट्रेलरमध्ये प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आयुष्य पुढे सरकण्यासाठी आवश्यक असलेली भावनिक मुक्तता आणि समजूतदार संवाद यांची जाणीव करून देणारा हा ट्रेलर विचार करायला भाग पाडतो. चित्रपटात सिद्धार्थ चांदेकरने साकारलेली हाऊस फादरची भूमिका ट्रेलरमध्ये मध्यवर्ती ठरते. मुलीमध्ये रमलेला पण स्वतःच्या भावनांपासून काहीशी दूर गेलेली ही व्यक्तिरेखा मनाच्या खोल कप्प्यात डोकावते. मुक्ता बर्वेची व्यक्तिरेखा आयुष्याच्या वळणावर उभी राहून स्वतःचे प्रश्न शोधताना दिसते, तर विजय केंकरे आणि रोहिणी हट्टंगडी यांचे अनुभवसंपन्न अस्तित्व कथेला स्थैर्य आणि वास्तवाची किनार देते. ट्रेलरमध्ये प्रत्येक पात्राच्या नजरेतून वेगवेगळ्या वेदना आणि आशा डोकावताना दिसतात.

### स्टार प्लसने दिली नव्या प्रेमकथेची झलक; नाव अद्याप गुलदस्त्यात!

■ मालिका विश्वात कायम चर्चेत असलेलं चॅनल म्हणजे स्टार प्लस ! आजवर स्टार प्लसने कित्येक वर्षांपासून प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या प्रेमकथा सादर केल्या आहेत. कालांतराने या चॅनेलने अनेक आयकॉनिक रोमँटिक शो केले आणि अनेक व्यक्तिरेखा प्रेक्षकांना दिल्या ज्यांची आठवण आजही प्रेक्षकांना आहे. प्रेमाची परिभाषा पुढे घेऊन जात स्टार प्लस लवकरच एका नव्या प्रेमकथेचा गोडवा घेऊन येण्यासाठी सज्ज होत आहे. आजच्या काळात प्रेक्षक नव्या कथा आणि मनाला भिडणाऱ्या प्रेमकथांची आतुरतेने वाट पाहत असताना अशा वेळी स्टार प्लस एक असा शो घेऊन येत आहे, जो प्रेमाची भावना आणि प्रेमाचा ताजातवाना अनुभव देण्याचं आश्वासन देत आहे. निर्मात्यांनी अद्याप शोचं नाव किंवा संपूर्ण तपशील जाहीर केलेले नसले तरी नुकताच रिलीज झालेल्या टीझरने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे.या हृदयस्पर्शी टीझरमध्ये शोचे मुख्य पात्र दाखवले असून क्रुशल आहुजा यांची युवराज शेखावत आणि कनिका कपूर यांची तारा ही भूमिका यातून बघायला मिळणार आहे..ही नवी मालिका लवकरच स्टार प्लसवर येणार असून आता प्रेक्षकांना देखील याची उत्सुकता आहे !

■

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे



# छत्रपती शिवरायांकडे 'चारित्र्य' आणि 'निश्चय' ही प्रभावी शस्त्रे होती : प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे

## लिंबा येथे नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा गौरव

■ लिंबा (प्रतिनिधी):

"शिवजयंती म्हणजे केवळ ढोल-ताशांचा गजर नव्हे, तर महाराजांचे चारित्र्य आणि विचारांचे आपल्या वर्तनात केलेले सिंचन होय. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या शिवरायांकडे 'चारित्र्य' आणि 'निश्चय' ही दोन प्रभावी शस्त्रे होती, तीच शस्त्रे आजच्या तरुणाईने अंगीकारायला हवीत," असे रोखठोक प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते व सिने-नाट्य दिग्दर्शक प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी केले.

शिवशंभो मित्र मंडळ, लिंबा तर्फे आयोजित शिवजयंती उत्सवात 'छत्रपती शिवराय: आजच्या तरुणाईचा आदर्श' या विषयावर ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.याप्रसंगी नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा गौरव करण्यात आला.

या सोहळ्याला सरपंच विष्णू चव्हाण, जि.प. सदस्य मदनराव भोसले, पं.स. सदस्य भगवानराव दुगाने, नारायणराव अरबाड, शिवाजीराव हरकळ, सुभाषराव हरकळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मदन इदगे यांनी केले, तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पराक्रम टोम्पे, बाबाजी कणसे,जयंती समिती अध्यक्ष गजानन मारुती चव्हाण,अनिल झाटे,नामदेव झाटे सर, सार्थक टोम्पे, विशाल कणसे, संजय झाटे, उमेश साखरे, सोमेश्वर कदम, पवन दुगाने, ऋषिकेश इदगे व शिवशंभू मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# रंजना नागपूरकर यांनी केलेल्या गंभीर आरोपांमुळे राजकीय व सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ

## धनंजय मुंडे आणि आमची बदनामी करण्याच्या हेतूने रचलेला डाव- फड पिता पुत्र

परळी | प्रतिनिधी :

रंजना नागपूरकर यांनी केलेल्या गंभीर आरोपांमुळे राजकीय व सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडालेली असतानाच या प्रकरणात आता नवा ट्विस्ट समोर आला आहे. संबंधित आरोपांवर प्रतिक्रिया देताना कैलास फड व त्यांचे चिरंजीव निखिल फड यांनी सर्व आरोपांचे ठामपणे खंडन करत आम्ही रंजना नागपूरकर यांना ओळखतही नाही, असा स्पष्ट दावा केला आहे.

कैलास फड यांनी माध्यमांशी प्रतिक्रिया देताना सांगितले की, रंजना नागपूरकर यांनी १७ लाख रुपये दिल्याचा जो आरोप केला आहे, तो नेमक्या कोणत्या पार्श्वभूमीवर व कोणत्या कारणासाठी करण्यात आला, याची आम्हाला कोणतीही माहिती नाही. हा संपूर्ण प्रकार मुद्दाम धनंजय मुंडे साहेब आणि आमची बदनामी करण्याच्या हेतूने रचलेला डाव असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

तसेच, रंजना नागपूरकर यांनी केलेल्या सर्व आरोपांचे खंडन करत कैलास फड व निखिल फड यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "आमचा आणि त्या महिलेचा कुठलाही संबंध नाही, आम्ही त्यांना ओळखतही नाही आणि आमची त्यांची कधीच भेट झालेली नाही." आवश्यक असल्यास आमचे CDR (कॉल डिटेल रेकॉर्ड) तपासावेत, तसेच कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास आम्ही पूर्णपणे तयार आहोत, असेही त्यांनी नमूद केले.

फड पिता-पुत्रांनी पुढे सांगितले की, जाणून-बुजून अशा प्रकारचे गंभीर आरोप करून आमची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला जात असून यापूर्वीही अशा प्रकारचा प्रयत्न झाल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकरणाकडे केवळ आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणातून पाहिले जात असून सत्य समोर यावे, अशी आमची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात आपली भूमिका अधिक स्पष्ट करण्यासाठी आणि कोणत्याही तपासासाठी आपण सहकार्य करू अशीही माहिती त्यांनी माध्यमांना दिली. नेमके तथ्य काय आणि काय खरे हे लवकरच स्पष्टहोईल परंतु हा विषय सध्या महाराष्ट्राच्या चर्चेच्या केंद्रस्थानी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# उरणमध्ये लहान मुलं व मुली पळवून घेऊन जाण्याचे प्रयत्न

## पोलीस प्रशासना मार्फत तपास मोहीम सुरु.

उरण वृत्तसंस्था

उरणमध्ये लहान मुलं व मुली पळवण्याचे प्रमाण वाढत असल्याने पालकांनी सावधानता बाळगणे आवश्यक आहे.महाराष्ट्रात लहान मुलं पळवण्याचं, ती बेपत्ता होण्याचं प्रमाण वाढतं आहे, असे एनसीआरबीच्या प्रकाशित झालेल्या आकडेवारीनुसार हे प्रमाण २०२१ ते २०२४ या काळात जवळपास ३०% नी वाढलं आहे. तर लहान मुलांना पळवून, नंतर त्यांना कामाला जुंपणाऱ्या, त्यांना भीक मागायला लावणाऱ्या आंतरराज्य टोळ्या तयार झाल्या आहेत. या टोळ्या सर्रास लहान मुलं पळवत आहेत आणि यावर सरकार नक्की काय कारवाई करत आहे हेच समजत नाही, असे राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. उरण मध्ये बोरी येथे लहान मुले पळविण्याचा प्रयत्न झाला मात्र स्थानिक नागरिकांनी तो प्रयत्न हाणून पाडला. या संदर्भात उरण पोलीस ठाण्यात बैठक सुद्धा संपन्न झाली आहे. बोरी किंवा उरण मधील इतर भागात खरच मुले पळविणारी टोळी आले आहेत का याचा अधिक तपास करीत असल्याचे तसेच नागरिकांनी कोणत्याही अफ़वाला बळी पडू नका असे आवाहन उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानीफ मुलाणी यांनी केले आहे.आपल्या परिसरात कोणतेही अनोळखी, संशयांस्पद व्यक्ती आढळून आल्यास त्वरित उरण पोलीस ठाण्यात संपर्क करावे असेही त्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे. उरण मधील विविध व्हाट्सअप ग्रुप वर लहान मुले चोरल्याचे अनेक संदेश व्हायरल होत आहेत. त्यामुळे उरण मधील जनता मुले पळविण्याच्या या मेसेजने भयभयित झाले आहेत. त्यामुळे सर्वांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन उरण पोलीस ठाण्या मार्फत करण्यात आले आहे. मुले चोरणारी टोळी सक्रिय आहे का याचा तपास पोलीस करीत आहेत.



## पालकांनी घ्यावयाची सावधानता

- मुलांना अनोळखी व्यक्तींसोबत न जाण्याची सूचना करा
- मुलांना घराबाहेर जाण्यापूर्वी पालकांना कळवण्याची सूचना करा
- मुलांना सुरक्षित मार्गाने शाळेत जाण्याची व्यवस्था करा
- मुलांना मोबाइल फोन वापरण्याची सूचना करा आणि त्यांचा वापर कसा करावा हे शिकवा
- मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा आणि त्यांना अनोळखी व्यक्तींसोबत ऑनलाइन संवाद न साधण्याची सूचना करा

# उरणात पोपटी पार्ट्यांची चवदार रंगत सुरु

## फुंडे महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी लुटला पोपटीचा आनंद

उरण वृत्तसंस्था

रायगड - उरण तालुका "पोपटी" या विशिष्ठ खाद्य पदार्थासाठी सर्वत्र प्रसिद्ध आहे. या पोपटीसाठी लागणारे सर्वात महत्वाचे जिन्नस म्हणजे गावठी वाल. मात्र सध्या उरण तालुक्यातील रुचकर गावठी वालाच्या शेंगा तयार झाल्या नसल्याने. खवय्यांना पुण्यावरुन आलेल्या वालाच्या शेंगांवरच समाधान मानावे लागत आहे.फुंडे महाविद्यालयातील १९९८-९९ मध्ये शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी कोप्रोली येथे एकत्र येऊन आपल्या विद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा देत पोपटीचा आनंद हा गाणी गुणगुणत ,हसत, खेळत,गप्पा ,मज्जा मस्ती करत लुटला.

वालाच्या शेंगां भामरुडाच्या (भांबुर्डी) पाल्यात मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजविल्या जातात. त्यामध्ये बटाटा तसेच अंडी, चिकन घालून त्यांची लज्जत वाढविली जाते. यालाच पोपटी असे म्हणतात. सध्या उरणात सर्वत्र पोपटी पार्ट्यांची धम्माल सुरु झाली असली तरीसुद्धा पुण्यावरुन आलेल्या वालाच्या शेंगाच वापरल्या जात आहे. रायगड सह उरणच्या मातीत पिकविलेल्या चवदार टपोर्या दाण्याच्या गावठी शेंगांच्या पोपटीलाच अधिक पसंती आहे. मात्र सध्या येथील गावठी शेंगा अजुन तयार झाल्या नसल्याने पुण्यावरुन आलेल्या शेंगावरच खवय्यांना सध्या समाधान मानावे लागत आहे. अजुन साधारण पंधरा - वीस दिवसानंतर तालुक्यातील गावठी वाल तयार होऊ लागतील आणि खऱ्या अर्थाने पोपटीला ती विशिष्ठ चव येणार आहे. या पोपटीतील वालाच्या शेंगा कितीही खाल्या तरी त्या पोटाला बाधत नाही हे त्यांचे वैशिष्ट आहे. पुण्यावरुन आलेल्या शेंगा साधारण ४० ते ५० रुपये किलोनी मिळत आहेत.

विदर्भात, खानदेशात ज्याप्रमाणे ज्वारी किंवा बाजरीच्या कणसांना भाजुन केलेला हुर्डा प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेच रायगड-उरण मध्ये गावठी वालाच्या शेंगांची पोपटी प्रसिद्ध आहे. शेतावर किंवा घराबाहेर मोकळ्या जागेत पोपटी पार्ट्यांची धम्माल पहायला मिळते. येथे काही ठिकाणी काव्यसंमेलन रंगतात तर गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदु:खाची देवाण घेवाणही होते.अशातच फुंडे महाविद्यालयात १९९८-९९ मध्ये शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन रविवारी पोपटी संमेलनाचे आयोजन केले होते.

यावेळी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत पोपटीचा आनंद हा गाणी गुणगुणत हसत,खेळत, गप्पा, मज्जा मस्ती करत लुटला आहे.यावेळी सर्व सहकार्यांना एकत्र आणण्याचे काम आदर्शवत विद्यार्थी मेघा भोईर, संजीवनी म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, संतोष जोशी, अलंकार म्हात्रे, मेघनाथ पाटील, संध्या घरत,उत्तम पाटील, गंधार पाटील, प्रभाकर गावंड, गिरीश पाटील, महेंद्र घरत, दिनेश म्हात्रे, रुपाली म्हात्रे,सुरेखा म्हात्रे, दमयंती पाटील, रंजित माळी, मनोजकुमार ठाकूर,सुवर्णा पाटील, राजेंद्र पाटील, विनोद ठाकूर, ज्योत्स्ना पाटील, प्रसाद पाटील, नवनीत पाटील, नितीन नारंगीकर यांनी केले आहे.



# पोलादपूर शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे महिला आघाडीच्या संयुक्त विद्यमाने हळदीकुंकू व 'होम मिनिस्टर' खेळ पैठणी चा कार्यक्रम उत्साहात संपन्न

पोलादपूर वृत्तसंस्था



पोलादपूर शहरात प्रथमच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या महिला आघाडीच्या संयुक्त विद्यमाने शहरातील महिला वर्गासाठी हळदीकुंकू व 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व जल्लोषात पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहरातील सर्व महिलांना पारंपरिक पद्धतीने हळदीकुंकू वाण देण्यात आले. त्यानंतर महिलांचा आवडीचा आणि मनोरंजनात्मक असणारा 'होम मिनिस्टर' खेळ पैठणी चा हा खेळ घेण्यात आला.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्यासर्वात मोठी चंद्रकोर सौ.दुर्वा दर्पण दरेकर सर्वात लांब मोठे केस सौ.सिद्धी अथर्व बुटाला सर्वात जास्त बांगड्या सौ.मयुरा गांधी ससर्वात मोठी चंद्रकोर सौ.दुर्वा दर्पण दरेकर सर्वात लांब मोठे केस सौ.सिद्धी अथर्व बुटाला सर्वात जास्त बांगड्या सौ.मयुरा गांधी सर्वात मोठा मंगळसूत्र सौ.पूनम कदम पब्लिक मध्ये तीन वस्तू लवकरात लवकर आणने असे तीन क्रमांक मानकरी सौ.प्रिया सलागरे सौ.अर्चना पवार सौ.संगीता मोरे पैठणीच्या मानकरी ठरल्यात प्रथम क्रमांक योगिता दरेकर द्वितीय क्रमांक कस्तुरी घाटे तृतीय क्रमांक आरती कासारर्वात मोठा मंगळसूत्र सौ.पूनम कदम

पब्लिक मध्ये तीन वस्तू लवकरात लवकर आणने असे तीन नंबर सौ.प्रिया सलागरे ,सौ. अर्चना पवार ,सौ.संगीता मोरे पैठणीच्या मानकरी ठरल्यात प्रथम क्रमांक योगिता दरेकर द्वितीय क्रमांक कस्तुरी घाटे तृतीय क्रमांक आरती कासार महिलांनी मनमुराद आनंद लुटत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व सूत्रसंचालन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व मनसे महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केले.

यावेळी शिवसेना पोलादपूर शहर महिला आघाडीच्या अश्विनी गांधी, सारिका पालकर, वैशाली चिकणे, आदिती नगरकर, सारिका अनिल खेडेकर, दुर्वा दरेकर, प्राची सुतार यांच्यासह महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी व शहरातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. हा कार्यक्रम महिलांसाठी सामाजिक एकोपा, आनंद व मनोरंजन यांचा संगम ठरला असून, भविष्यातही असे उपक्रम राबविण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

# राज्यातील महानगरपालिका निवडणुकीतील घवघवीत यशाचा भाजप कार्यकर्त्यांकडून जल्लोष

महाड वृत्तसंस्था

मुंबईसह राज्यातील विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या सर्वाधिक यशाचा आनंद महाड शहरातील भाजप कार्यकर्त्यांनी शुक्रवारी मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला.

महाड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, चवदारतळे येथील श्रीराम मंदिर तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पुरुष व महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी फटाके फोडून, एकमेकांना पेढे भरवून हा विजयोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर झेंडे फडकावत, जोरदार घोषणाबाजी करत शहरातून दुचाकी रॅली काढण्यात आली. या विजयोत्सवात भाजपचे स्थानिक नेते बिपिन म्हामुणकर, तालुका अध्यक्ष निलेश देवगिरकर, नगरसेवक सुमित पवार, महिला आघाडी प्रमुख डॉ. मंजुषा कुद्रीमोती, नमिता दोसी, अशा चोरट, ॲड. आदित्य भाटे, सुनील सोंडकर, अमोल सुंभे, विकास दरेकर, शुभम भावेकर, समृद्धी खोडके, स्वप्नाली नाझरे, शितल नाझरे, स्नेहल म्हामुणकर, रूपाली पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

"आज महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये मुंबईसह सर्वत्र भारतीय जनता पक्षाला घवघवीत यश मिळाले असून भाजप हाच सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. महायुतीलाच जनतेने स्पष्ट कौल दिल्याचे या निकालातून दिसून येते. या यशामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार प्रवीण दरेकर यांचा मोलाचा वाटा आहे, तसेच ज्या ठिकाणी युती झाली त्या सर्व घटक पक्षांचे व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार. या विजयाचा लाभ आम्हाला आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये निश्चितच मिळेल!"



# बेकायदेशीररित्या गाईंची वाहतूक करणाऱ्या बोलेरो पिकप सह तीन आरोपी महाड एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात

पोलादपूर वृत्तसंस्था



शुक्रवार दिनांक 16 जानेवारी रोजी सकाळी पावणे सहा वाजताच्या सुमारास मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड एमआयडीसी पोलिसांनी महिंद्रा बोलेरो पिकप मधून अवैधरित्या गाईंची वाहतूक करणाऱ्या तिघांवर मोठी कारवाई केली आहे महाड एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर सावित्री पुलावर शुक्रवारी सकाळी पावणेसहा वाजताच्या सुमारास कत्तलीसाठी गाईंची अवैधरित्य वाहतूक करणाऱ्या तिघांवर कारवाई करण्यात आली आहे असलम अब्दुल पेवेकर वय वर्ष 50 राहणार वरंध मोहल्ला तालुका महाड संतोष गंगाराम तांबे वय वर्ष 31 राहणार किये बौद्धवाडी तालुका महाड व एका अज्ञात आरोपीवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे शुक्रवारी सकाळी पहाटे महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकप क्रमांक एम एच 06 बी डब्ल्यू 9355 मधून कोणताही परवाना नसताना चार गाईंची बेकायदेशीररित्या वाहतूक करताना पोलिसांनी ही कारवाई केली आहे या कारवाईत पोलिसांनी महिंद्रा पिकप सह चार गाई असा एकूण बारा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून महाड एमआयडीसी पोलिसांनी तिघा आरोपींवर भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम* 325,महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 सुधारणा 1995 चे कलम 5,5(अ)(ब),9,11, महाराष्ट्र कीपिंग मोमेंट ऑफ कॅटल इन अर्बन एरिया कंट्रोल ॲक्ट कलम 03, पशु क्रूरता अधिनियम कलम 11(1), पशु वाहतूक अधिनियम कलम 47(अ)(ब),48,54(1,2,3), मोटार वाहन का.कलम 66,192 तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 चे कलम 119 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

# आष्टी येथे राज्यस्तरीय डॉ.स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाचा शानदार शुभारंभ

## तरुणांनी कृषीवर आधारित उद्योजकेकडे वळावे : स्वागताध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे

### शासनाच्या योजनांमुळे जनता भिकारी तर शेतकरी आळशी होऊ लागला : धर्माचार्य ह.भ.प.आदिनाथ महाराज आंधळे

### शेतकऱ्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करावा : माजी आ.बाळासाहेब आजबे

**आष्टी ( प्रतिनिधी)**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी समाजातील सर्व वर्गांकडे अत्यंत काळजीपूर्वक लक्ष दिले शेतकऱ्यांविषयी देखील त्यांना अत्यंत आपुलकी होती सैन्यांना ते शेतकऱ्यांच्या पिकाची पिकांची नासाडी होऊ देऊ नये याची काळजी घेण्यास सांगत.. रयतेच्या या राजाची आज ३९६ वी जयंती असल्यामुळे या शुभमुहूर्तावर आपण स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा शुभारंभ केला असून तरुणांनी स्टार्टअप इंडिया या योजनेतून कृषी व्यवसायावर आधारित उद्योजकतेकडे वळावे असे आवाहन शिक्षण महर्षी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

तर माजी आमदार बाळासाहेब म्हणाले की,कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार असून आर्टिफिशियल इंटेलिजन्स वापरून पद्धती वापरून बीज प्रक्रिया पाणीपद्धती रोग नियंत्रण कीड नियंत्रण करून उत्पादकता वाढवावी असे आवाहन केले

तर केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या फुकट वाटप धोरणामुळे सर्वसामान्य जनता भिकारी आणि कष्टकरी असलेला आळशी होऊ लागला आहे शासनाने या फुकटच्या योजना राबवण्यापेक्षा शेतकऱ्यांनी पिकवलेल्या अन्नधान्यास हमीभाव द्यावा अशी आग्रही मागणी छत्रपती संभाजीराजे गडाचे मठाधिपती ह.भ.प.आदिनाथ महाराज आंधळे यांनी केली.







आष्टी येथील राज्यस्तरीय डॉ.एम.एस.स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.यावेळी या माजी आ.भीमराव धोंडे,माजी आ. बाळासाहेब आजबे,माजी आ.जनार्दन तात्या तुपे,महंत विठ्ठल महाराजगहिनाथगडकर, ह.भ.प.रामकृष्ण रंधवेबापू, ह.भ.प.आदिनाथ महाराज आंधळे,ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर,कृषी आयुक्त सुनीलदादा चव्हाण, सुशीलाताई मोराळे,डॉ.शिवाजी राऊत,सौ.दमयंतीताई धोंडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी साळवे,उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,धैरशील थोरवे, रामराव खेडकर,लालाभाऊ कुमकर, पांडुरंग नागरगोजे,अशोक साळवे, काकासाहेब शिंदे, हरिभाऊ जंजिरे, बाबूभैय्या गर्जे, दिनकर महाराज तांदळे, सुदामकाका झिंजुर्के,शिवाजी सुरवसे,बबनअण्णा झांबरे, बबन आवटे,रत्नदीप निकाळजे,उपसभापती नामदेव धोंडे,अण्णासाहेब भोसले,युवा नेते अजय धोंडे,अभय धोंडे, चेअरमन राजेंद्र धोंडे, भाऊसाहेब घुले,प्राचार्य डॉ.श्रीराम आरसुळ,अंकुश मुंडे,बाबासाहेब शिंदे,नवनाथ सानप,भाऊसाहेब भराडे, सतीशमामा झगडे,ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, उत्तम बोडखे,इंजि. बाळासाहेब भुकन,दिलीप मस्के फौजी, अजय वाबळे, रोहित गांगर्डे, सदा पाटील दिंडे,माजी सरपंच संतोषभैय्या चव्हाण,पांडुरंग गावडे,संजय चंदनशिव,डॉ.डी. बी.राऊत, प्राध्यापक शिवदास विधाते व सर्व प्रशासन अधिकारी, संजय नालकोल संभाजी दहातोंडे,बाबा ससाने, गौतम सावंत,कुंडलिक आस्वर, गौतम ससाने,रामनाथ बन, प्रा.बाळासाहेब धोंडे,हरी पाटील बोडखे,प्राचार्य सुरेश बोडखे,प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ,चेअरमन दादासाहेब हजारे,नानाभाऊ वाडेकर, बबनराव डोके,विठ्ठल लांडगे, सरपंच भरत जाधव,सुधीर जगताप आदी सरपंच, उपसरपंच,कार्यकर्ते,नागरिक, शेतकरी,महिला,विद्यार्थी, प्राध्यापक,शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आ. भीमराव धोंडे पुढे म्हणाले की,शासकीय योजना अंमलबजावणी विषयी धोरण बदलले पाहिजे.भ्रष्टाचार करणाऱ्यांना कोणाची भीती उरली नसल्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा होऊन दंडाची तरतूद केली पाहिजे.डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांनी अन्नधान्याची टंचाई लक्षात घेऊन कोरडवाहू शेतीवर संशोधन करून शासकीय उपाययोजनांची अंमलबजावणी करावी यासाठी धोरण तयार केले त्यांच्या या महान कार्यामुळे आपण त्यांच्या नावाचे आज तिसऱ्या वर्षी कृषी प्रदर्शन असे आयोजन केले असून या कृषी प्रदर्शनामधून प्रेरणा घेऊन युवकांनी शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीचे उत्पादन वाढवले पाहिजे तरुणांनी कृषीवर आधारित उद्योगाकडे वळले पाहिजे कृत्रिम बुद्धिमत्ता आर्टिफिशियल इंटेलिजन्स द्वारे ऊस लागवडीविषयी आपण विचार करत आहोत असे सांगत अशा प्रकारच्या कृषी प्रदर्शनातून अत्याधुनिक अवजारे आणि अत्याधुनिक पीक पद्धतीची माहिती मिळत असल्यामुळे आपण कृषी प्रदर्शनाचे आयोजन करत असून यासाठी शासनाचा एक रुपया देखील अनुदान घेतलेले नसून त्यासाठी अर्ज देखील केलेला नाही बालपणापासून शेतीविषयक आवड असल्यामुळे शिक्षण संस्थादेखील शेतकरी नावाने सुरू केली असून शंभर शाळा आणि महाविद्यालयाद्वारे चाळीस हजार विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय निर्माण करून दिली आहे संस्थेसाठी शंभर एकर जमिनीचे दान दिले असून भविष्यात कॅन्सर या रोगावर उपचारासाठी २०० कोटी रुपये खर्च करून कॅन्सर हॉस्पिटल बांधकामाचा आपला मनोदय असून विधानसभेतील पराभवाचा आणि विजयाचा आपण कधीच विचार केला नसून जनतेसाठी सतत कार्यरत राहणार आहोत असे सांगत मोठ्या उद्योजकांचा जीवन दिवस पाहिल्यास प्रत्येकाने संघर्ष केल्याचे दिसून येत आहे अडाणी समूहाचे गौतम अडाणी यांनी देखील सायकलवर फिरून कापड विकले आहे परिश्रमातून त्यांनी यशाचे उत्तुंग शिखर गाठले असे दिसून येत आहे बाबू गर्जे हा हा ग्रामीण भागातील युवक जिजाई मसाले दुबईमध्ये देखील विक्री करत आहे ही अभिनंदन बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मार्गदर्शन करताना ह.भ.प. धर्माचार्य आदिनाथ महाराज आंधळे यांनी देशाच्या आणि राज्याच्या सद्यस्थितीवर भाष्य करताना शेती हा विषय चांगल्या पद्धतीने हाताळण्याची आवश्यकता निर्माण झाली असून शासनाच्या विविध योजनांमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य मजूर आळशी झाला आहे शेतकरी लाचार झाला आहे शेती कामाला मजूर मिळत नाहीत सदन शेतकरी आणि नोकरी असलेले मुलांचे आईबाप शासनाकडे निराधार असल्याचे दाखवून अनुदान मागत आहेत शेतीमध्ये भरमसाठ पाण्याचा आणि अनावश्यक रासायनिक खताचा वापर केल्यामुळे शेतीचे आणि हे उत्पादन खाणाऱ्याचे आरोग्य बिघडत चालले आहे हे गंभीर आहे भारतीय नागरिक गेल्या ७० वर्षापासून शेती पिकाला हमीभावाची मागणी करत आहे परंतु अद्यापही शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळत नाही हे देशाचा प्रमुख असणारा घटक अन्नधान्य पिकवणारा शेतकरी अडचणीत आलेला असून त्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे शेतकरी हा राजा असून राजासारखे जीवन शेतकऱ्यांनी जगले पाहिजे. यासाठी शासकीय पातळीवरील प्रयत्न केले पाहिजेत संकरित गाई पेक्षा गावरान गाय प्रत्येक शेतकऱ्याने पाळावी एक देशी गावरान गाय असेल तर एक किलो शेणापासून तीन कोटी जिवाणू तयार होतात हेच जिवाणू उत्पादन वाढवत असतात रासायनिक खतामुळे शेती नापीक बनत चालली आहे याचाही विचार करण्याची वेळ आली असून देशाच्या पंतप्रधानांनी आणि मुख्यमंत्र्यांनी या सर्वसाधारण जनता भिकारी करणाऱ्या आणि शेतकऱ्यांना लाचार करणाऱ्या फुकटच्या योजना बंद कराव्यात असा संदेश पंतप्रधानांपर्यंत पोहोचवावा असे आवाहन उपस्थित पत्रकारांना केले.

यावेळी बोलताना राज्याचे माजी सनदी अधिकारी सुनीलदादा चव्हाण यांनी आष्टी सारख्या दुष्काळग्रस्त भागामध्ये शाश्वत सिंचन व्यवस्था नसल्यामुळे शेतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असून मजूर समस्येमुळे यांत्रिकीकरणावर भर द्यावा असे आवाहन केले या शुभारंभ समारंभामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी साळवे, ह.भ.प.परायण रामकृष्ण रंधवे विठ्ठल महाराज गहिनीनाथ गडकर यांची समायोजित भाषणे झाली. प्रास्ताविक शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीराम अडसूळ यांनी केले.

तर आभार प्रदर्शन पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन निलेश दिवटे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता आर्टिफिशियल इंटेलिजन्स या तंत्रज्ञानाचा वापर करून स्व.अजितदादा पवार यांचा या डॉ. एम.एस. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनामध्ये संदेश प्रसारित करण्यात आला.त्यावेळी भाऊक वातावरण निर्माण झाले होते.

---

# दिंद्रुडच्या चंद्रभागा पोद्दार स्कूलचा शिवजन्मोत्सव उत्साहात; सिरसाळ्यातील प्रेरणा महिला महाविद्यालयात भव्य सांस्कृतिक कार्यक्रम

### विद्यार्थ्यांचे पोवाडे, नाट्यप्रयोग, भाषणे व नृत्य सादरीकरणांनी गावकऱ्यांची मने जिंकली; मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती

**सिरसाळा (अतुल बडे):**

दिंद्रुड येथील चंद्रभागा लर्न इंग्लिश स्कूल च्या वतीने आयोजित शिवजयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव कार्यक्रम सिरसाळा येथील प्रेरणा महिला महाविद्यालयात भव्य व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कला सादर करत छत्रपतींच्या कार्याचा गौरव केला.

विद्यार्थ्यांनी सादर केलेले पोवाडे, विशेषतः अफजलखान वधाचा प्रसंग, तसेच सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण चळवळीवरील नाट्यरूप सादरीकरण, महापुरुषांवरील प्रभावी भाषणे आणि आकर्षक नृत्याविष्कार यांना उपस्थित ग्रामस्थांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमामुळे परिसरात देशभक्ती आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतुल ठोंबरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक निंदाने सर, अनिलजी जाधव, पोलिस सहायक निरीक्षक गोरखनाथ दहिफळे डॉ. रश्मी नावंदर मॅडम, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन संतोषजी पांडे, पत्रकार अशोक गलांडे, मिलिंद चोपडे,बाळासाहेब गरड, दिगंबर देशमुख, अनिलजी देशमुख, अतुल बडे,नितेश काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्य नियोजनातून पार पडले असून उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन शाळेचे समन्वयक राजेंद्र पांडे यांनी मानले.

---

# रमजान महिन्यात परळीत अखंडित पाणीपुरवठा सुरळीत करू- सभापती सौ.जयश्रीताई गित्ते

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर परळी नगर परिषद पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांनी आढावा बैठक घेतली. रमजान महिन्यात शहरात अखंडित व सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

आ. धनंजय मुंडे, ना. पंकजाताई मुंडे व लोकनेते प्रा. टी. पी. मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांच्या दालनात झालेल्या बैठकीत झाली व मार्गदर्शन केले. रमजान महिन्यात उपवास (रोजा), धार्मिक विधी आणि स्वच्छतेला विशेष महत्त्व असल्याने पाणीपुरवठ्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी विभाग सतर्क राहणार असल्याचे सांगण्यात आले.

परळी वैजनाथ शहरातील विविध प्रभागांतील नगरसेवकांनीही आपल्या सूचना मांडल्या असून त्या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. ज्या भागात पाणीपुरवठा कमी दाबाने किंवा अनियमित होत असेल, त्या भागातील तक्रारी तत्काळ सोडवण्यात येणार आहेत.

तसेच, ज्या भागात पाणीपुरवठा होत नाही अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार एक महिन्यापर्यंत टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्याची तयारी नगर परिषद प्रशासनाने दर्शविली आहे. नागरिकांनी पाणीपुरवठा संदर्भातील अडचणी असल्यास नगर परिषद पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी युवा नेते रवींद्र (पापा) गित्ते यांच्यासह नगरसेवक अजिज कच्ची, नगरसेवक मंगल इस्माईल, हाजी बाबू, नगरसेवक कादर कुरेशी, नगरसेवक नितीन बागवाले, नगरसेवक अल्ताफ पठाण,नगरसेवक सय्यद हसन, नगरसेवक मोसीन,नगरसेवक बबुभाई, युवा नेते राजीव शेख तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख किरण उपाडे व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

# छत्रपती शिवरायांच्या विचारांनी समाज एकत्र – प्रदीप मुंडे



**परळी वैजनाथ** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना नेते प्रा. टी.पी. मुंडे सरांच्या संपर्क कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी "छत्रपती शिवरायांनी अठरा पगड जातीला सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना केली," असे प्रतिपादन नागापूर जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य प्रदीप मुंडे यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. शिवरायांच्या शौर्य, पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी धोरणांचा गौरव त्यांनी केला. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून न्याय, समानता आणि स्वाभिमान यावर आधारित स्वराज्य उभारण्याचे कार्य शिवरायांनी केले. प्रदीप मुंडे यांनी म्हटले की, शिवरायांचे विचार आजही तरुणांसाठी प्रेरणादायी आहेत. जात-पात, भेदभाव यांना दूर ठेवून "माणूस हाच खरा धर्म" हा संदेश त्यांनी कृतीतून दिला. त्यांच्या कार्यातून संघटनशक्ती, धैर्य आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा मिळते.यावेळी प्रा.संदीपान मुंडे ,संजय पवार,विलास कचले, अरुणाचल रोडे, सिद्धार्थ देवडे ,तुकाराम फड, अण्णा सरवदे, राजाभाऊ गित्ते ,शिवम गडबे आदी उपस्थित होते.

---

# श्रीरामानंतर महिलेचा आदर करणारा एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवराय : ॲड.माधवराव माने यांचे प्रतिपादन

**महागाव| प्रतिनिधी**

प्रभु श्रीरामानंतर महिलेचा आदर करणारा एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवराय आहेत असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.माधवराव माने पाटील यांनी केले आहे.

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय यांच्या जयंतीनिमित्त हिवरा (संगम) येथील छत्रपती शिवरायांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण व चौक सौंदर्यीकरण कामाच्या लोकार्पण सोहळ्यात उद्घाटक म्हणुन ते बोलत होते.पुढे बोलतांना ॲड.माने म्हणाले की,आज देशात महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असुन याला आळा घालण्याकरिता छत्रपती शिवरायांनी ज्या प्रमाणे महिलेवर अत्याचार करण्याचे हातपाय तोडले व जरब बसविली, परस्त्रीस मातेचा दर्जा दिला.तीच शिकवण



सताधाऱ्यांनी अंमलात आणण्याची गरज आहे. जगात प्रभु श्रीरामानंतर परस्त्रीचा आदर करणारा एकमेव राजा जर कोणी असेल ते छत्रपती शिवराय आहेत.आज देशातील तरुण पिढीला छत्रपती शिवरायांचे विचार अंगीकारण्याची गरज आहे तेव्हाच स्वराज्याचे सुराज्य निर्माण होईल असे ते म्हणाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ.नामदेवराव ससाणे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणुन भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, ॲड.रमेश पाटील, ॲड.अनिल माने,माजी जि. प.सदस्य साहेबराव पाटील, माजी जि. प. सदस्या,जिल्हा बँकेच्या संचालिका सौ.स्मिताताई साहेबराव पाटील, सरपंचा सौ.मेघाताई शिरीष बोरुळकर, उपसरपंच शरद पाटील, पोलिस पाटील प्रविण कदम ,माजी सभापती ललिताबाई वसंतराव जामकर, शिवसेना तालुका प्रमुख रविंद्र भारती,पत्रकार गजानन वाघमारे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुकुंद पांडे,विजय बोंपिलवार,शफीसेठ सुरैय्या,अशोक जयस्वाल, ग्रा. पा. सदस्य पंजाब पाटील, राजु धोतरकर,अशोक पाटील,माजी सरपंच डॉ. धोंडेराव बोरूळकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहेबराव पाटील यांनी केले आहे संचलन राजु गिरी यांनी केले तर आभार महेश कामारकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी छत्रपती शिवराय चौक समितीचे अध्यक्ष देवेंद्र कदम,उपाध्यक्ष सुनिल चव्हाण,सचिव महेश कामारकर,कोषाध्यक्ष मुकुंद जामकर,सहसचिव माजी सरपंच प्रविण जामकर ,सदस्य किरण काळे,अनिल मुडेवाड, निलेश करमोडकर,शेख फिरोज,रोहित फाळके, संतोष पिंपळे,सुदर्शन कदम, प्रदीप कदम,विनोद कदम, सोनु भैसे यांनी अथक परिश्रम घेतले.